# शुध्दीपत्रक

**सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी कार्यकारी अभियंता (स्थापत्य) व उप अभियंता (स्थापत्य) संवर्गात घेणेबाबत.**

" वरील विषयी https://mahapwd.gov.in हया संकेतस्थळावर देण्यात आलेल्या जाहिरातीत अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ही "दि.२७/१०/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत" अशी नमुद करण्यात आलेली आहे. काही अपरिहार्य कारणामुळे सदर मुदत "दि.०३/११/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत" वाढविण्यात येत आहे."

**( शा.सु.गांगुर्डे )**
**अधीक्षक अभियंता (इमारती),**
**संकल्पचित्र मंडळ (सा.बां.),**
**कोंकण भवन, नवी मुंबई.**

Rojgar Marathi

**सा.बां.विभागाच्या https://mahapwd.gov.in या संकेतस्थळवर प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीचा मसुदा.**

**अधीक्षक अभियंता (इमारती), संकल्पचित्र मंडळ (सा.बां.), कोंकणभवन, नवी मुंबई.**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ मधील तरतुदीनुसार मुख्य अभियंता (संकल्पन), सा.बां.विभाग, कोंकणभवन, नवी मुंबई व अधीक्षक अभियंता (इमारती), संकल्पचित्र मंडळ, कोंकणभवन, नवी मुंबई यांचे अधिपत्याखालील सा.बां. विभागाच्या प्रकल्पाचे संकल्पन व रेखाचित्र (प्रकल्पांचे संकल्पन करणे व रेखाचित्र तयार करणे) इ. प्रकारचे कामकाज पार पाडण्यासाठी व महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही जिल्हयातील प्रकल्पाचे संकल्पन व रेखाचित्र करणेसाठी सा.बां. विभागाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांची सेवा करार पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | पदसंख्या (अंदाजे) |
|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | १ |
| २ | उप अभियंता (स्थापत्य) | १ |

प्राप्त अर्जामधून पात्र उमेदवारांची निवड करुन सूची (Panel) तयार करण्यात येईल. सदर उमेदवारांची निवड करातांना सुयोग्य उमेदवाराची उपरोक्त नमूद शासन निर्णयामधील विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून कामाची गरज पाहून जास्तीत जास्त १ वर्षासाठी करार पध्दतीने नेमणूक करण्यात येईल. याबाबत सर्व अधिकार मुख्य अभियंता (संकल्पन), सा.बां.विभाग, कोंकणभवन, नवी मुंबई व अधीक्षक अभियंता (इमारती), संकल्पचित्र मंडळ, कोंकणभवन, नवी मुंबई यांना राहतील.

वरीलप्रमाणे पात्रतेचे निकष पुर्ण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी विहित नमुना (प्रपत्र 'अ') मध्ये अधीक्षक अभियंता (इमारती), संकल्पचित्र मंडळ, चौथा मजला, कोंकणभवन, नवी मुंबई - ४०० ६१४ यांच्याकडे दि. २७/१०/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अर्ज सादर करावेत.

**( शा.सु.गांगुर्डे )**
**अधीक्षक अभियंता (इमारती),**
**संकल्पचित्र मंडळ (सा.बां.),**
**कोंकण भवन, नवी मुंबई.**

Rojgar Marathi

**संकल्पचित्र मंडळ, सा.बां.विभाग, नवी मुंबई अंतर्गत सेवानिवृत्त अधिका-यांच्या करार पध्दतीने सेवा घेण्यासाठी तपशील व अटी :**

| अ. क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचा तपशील | सा.बां. विभागातुन खालील पदावरुन सेवानिवृत्त | आवश्यक अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | Design / scrutiny of design of multistoried buildings requiring dynamic seismic analysis. | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | सा.बां. विभागातील संकल्पचित्र मंडळात रकाना (४) मध्ये नमूद केलेल्या कामाचा ३ वर्षे अनुभव ज्या दरम्यान G + ३ हून अधिक उंचीच्या किमान २५ इमारतींचे संकल्पचित्र बनवण्याचा/ तपसण्याचा अनुभव |
| २ | उप अभियंता (स्थापत्य) | Computer-aided design / scrutiny of design and drawings & preparation of GAD of special type and other bridges. | उप अभियंता (स्थापत्य) | i) सा.बां.विभागातील मार्ग प्रकल्प (Road Projects) विभागात उप अभियंता पदावर किमान ३ वर्षे सेवेचा अनुभव; अधिक ii) सा.बां.विभागातील संकल्पचित्र मंडळात उपअभियंता पदावर किमान ३ वर्षे सेवेचा अनुभव |

**सदर नेमणूका हया खालील शर्ती व अटींच्या अधिन राहतील.**

१. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी ज्या पदासाठी अर्ज केले आहेत. त्या पदाचा विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता तसेच वर नमूद केलेला अनुभव असणे आवश्यक आहे.

२. सदर नेमणूक एक वर्षासाठी राहील. त्यापेक्षा जास्त वाढविण्याची आवश्यकता भासल्यास संबंधीताचे काम व आवश्यकता पाहून नियुक्ती अधिकारी तसा निर्णय घेऊ शकतात.

३. नियुक्त अर्जदाराला त्यांनी विहित कार्यपालन केल्यामुळे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ मधील अटी व शर्तीप्रमाणे शासन निर्णयासोबत असलेल्या परिशिष्ट 'अ' नुसार मासिक परिश्रमीक अनुज्ञेय राहील.

४. करारपध्दतीने नियुक्ती देण्यांत आल्यामुळे संबंधीतांस शासनाच्या कोणत्याही विभागात/संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल. याबाबत अर्जदाराने रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज केलेले प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करावे. सदर शपथपत्राचा नमुना प्रपत्र 'ब' नुसार असावा.

५. करारपध्दतीवर नियुक्ती करण्यात येणाऱ्या कर्मचारी/अधिकारी त्यांच्या वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

६. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांची शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबतचा शल्यचिकित्सक अधिकाऱ्याचे मूळ प्रमाणपत्र द्यावे लागेल.

Rojgar Marathi

७. करारपध्दतीने नियुक्ती झालेल्या अर्जदारास नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/ हमीपत्र अटी व शर्ती संबंधीत उमेदवारास मान्य आहेत याबाबत बंधपत्र उमेदवारास रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर देणे बंधनकारक राहील.

८. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्या विरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण नसावे याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झाले आहे, त्या संबंधीत कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र प्राप्त करुन सादर करणे बंधनकारक आहे.

९. नियुक्ती अधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील, त्याबाबत कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

१०. सदर अधिकारी/कर्मचारी त्यांच्यावर सोपविलेल्या पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही कामात गुंतलेला नसावा.

११. अशा अधिकारी/कर्मचारी यांना conflict of interests जाहीर करणे आवश्यक राहील.

१२. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१३. अशा करार पध्दतीवरील अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती, कामाबाबत व आधारसामुग्री बाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

१४. नियुक्ती अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१५. क्षेत्रिय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही नैसर्गिक अपघात व काही आजार उद्भवल्यास कार्यालय / शासन बांधील राहणार नाही.

१६. अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी /कर्मचारी यांनी त्यांचे कुटुंब निवृत्तीवेतन मंजुरीस्तव महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्तावेज सादर करणे आवश्यक आहे.

१७. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१८. मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांना पत्र ई-मेलद्वारे कळविण्यात येईल. यास्तव अर्जदारांनी आपल्या वैयक्तिक माहितीत त्यांचा ई-मेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी अधीक्षक अभियंता (इमारती), संकल्पचित्र मंडळ, कोंकणभवन, नवी मुंबई यांच्या सुचना फलकावर दि. २७/१०/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात येईल व अंतिम निवड झालेल्या अर्जदारांची यादी वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर यथावकाश प्रसिध्द करण्यांत येईल, तसेच वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच अंतिम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तिक ई-मेलद्वारे व पत्राव्दारे कळविण्यांत येईल.

१९. सदर नियुक्ती क्षेत्रिय स्थळावर संबंधीत विवक्षित कामासाठी करण्यात येत असून त्यासाठी योग्य उमेदवार न भेटल्यास काही किंवा पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार समितीस आहे.

२०. करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यास/कर्मचाऱ्यास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार नसतील.

२१. उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त शासन नियुक्ती अधिकारी वेळोवेळी ठरवतील त्या अटी व शर्ती अंतीम राहतील.

## प्रपत्र 'अ'

## विहित नमुन्यातील अर्ज

### संकल्पचित्र मंडळ, सा.बां. विभागातील सेवा करार पध्दतीने विवक्षित कामांसाठी सेवानिवृत्त अभियंता यांची नेमणूक करार पध्दतीने घेणेबाबतचा अर्ज.

| उमेदवाराने स्वत:चे छायाचित्र चिकटवून छायाचित्रावर व अर्जाच्या पृष्ठावर येईल अशी स्वाक्षरी करावी. |
|---|

प्रति,

**मुख्य अभियंता (संकल्पन)**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**४ था मजला, कोंकणभवन,**
**नवी मुंबई.**

**अर्ज केलेल्या पदाचे नांव** : कार्यकारी अभियंता / उप अभियंता

| | | |
|---|---|---|
| १ | **अर्जदाराचे नांव** | : |
| २ | **कायमचा पत्ता** | : |
| ३ | **दूरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी सह (अनिवार्य)** | : |
| ४ | **ई-मेल पत्ता(अनिवार्य)** | : |
| ५ | **सध्याचा पत्ता** | : |
| ६ | **जन्मतारीख** | : |
| ७ | **राष्ट्रीयत्व** | : |
| ८ | **लिंग** | : |
| ९ | **अवगत भाषा** | : |
| १० | **शैक्षणिक अर्हता** | : |

१२ **अनुभव :**

| अ. क्र. | हुद्या व वेतन श्रेणी | कार्यालयाचे नांव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |

१३ **सेवानिवृत्तीचा दिनांक :**

१४ **सद्य:स्थितीत कुठे काम करीत असल्यास तपशील :**

मला पुर्णपणे ज्ञात आहे की, पायाभुत सुविधा निर्मिती एमपॅनलमेंट द्वारे प्रकल्पांचे क्षेत्रिय/कार्यालयीन कामाकरीता सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी **कार्यकारी अभियंता / उप अभियंता** या पदाकरीता उमेदवाराची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पद जाहिरातीत नमुद विवक्षीत कामासाठीच असून जास्तीत जास्त १२ महिन्यांच्या कालावधीसाठी आहे. कामाच्या निकडीनुसार संकल्पचित्र मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोंकणभवन, नवी मुंबई व त्या अंतर्गत घटक कार्यालयात माझी काम करण्याची तयारी आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझ्या माहितीप्रमाणे वर दिलेला तपशील सत्य व अचुक आहे. यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पुर्व सुचने शिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल याची मला पुर्ण जाणीव आहे.

**ठिकाण :** **अर्जदाराचे नांव व सही**

**दिनांक :**

## प्रपत्र 'ब'

मी ---------------------------------------- वय --------------- राहणार ------------------
----------------------------------------- शपथेवर पुढिलप्रमाणे लिहून देत आहे.

सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामांसाठी घेण्यासाठी संकल्पचित्र मंडळ, नवी मुंबई, सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत यांनी त्यांचे अंतर्गत कार्यालयांसाठी अर्ज मागविण्याच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज करीत आहे. सदर निवड प्रक्रियेत माझी निवड होऊन मी कार्यरत झाल्यावरही त्या सेवेच्या आधारे शासनाच्या कोणत्याही विभागात/संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणताही लाभ मिळण्याचा अधिकार प्राप्त होणार नसल्याचे मला ज्ञात आहे व मी तशी कोणतीही मागणी करणार नाही.

( अर्जदाराची सही )

ठिकाण :

दिनांक :

---

अर्जदारास सूचना : सदर नमुना रु. १००/- च्या स्टँम्प पेपरवर टाईप करुन नोटराईज करुन अर्जास जोडावा.